दि. २०/०५/२०२३

म. टा. पु. पा. न. १

# रुग्णालयाची रखडपट्टी

## कॅन्सर रुग्णालयाची निविदा रद्द; पुन्हा नव्याने प्रक्रिया

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरमध्ये कॅन्सर रुग्णालयाच्या उभारणीसाठी प्रशासनामार्फत निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. काही कंत्राटदारांनी निविदा सादरही केल्या होत्या. परंतु, आता ही निविदा प्रक्रियाच रद्द करण्यात आली आहे. काही बदलांसह नव्याने निविदा प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे शहरातील कॅन्सर रुग्णालयाची उभारणी रखडणार असल्याची चर्चा आहे.

महापालिकेच्या विकास आराखड्यात भाईंदर पश्चिमेला प्रसूतीगृह व वाचनालयासाठी जागा आरक्षित आहे. येथे कॅन्सरवर मोफत उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कॅन्सर रुग्णायलाची उभारणी करावी, यासाठी आमदार गीता जैन पाठपुरावा करत होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या १० कोटी रुपयांच्या निधीतून रुग्णालय उभारण्यासाठीची निविदा पालिकेमार्फत




प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले होते.

या रुग्णालयाच्या निर्मितीचे काम मिळवण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने दिलेल्या मुदतीत काही कंत्राटदारांनी निविदा भरून दर सादर केले होते. हे दर पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी खुले करणे आवश्यक होते. मात्र प्राप्त दर हे सुमारे दीड महिन्यांपासून खुले करण्यात आले नव्हते. परिणामी निविदा प्रक्रिया रखडली होती. आता ही निविदा प्रक्रियाच रद्द करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे.

### बड्या नेत्यांच्या वादात रखडपट्टी?

कॅन्सर रुग्णालयाची निविदा शहरातील बड्या नेत्यांमधील अंतर्गत वादामुळे रखडल्याची चर्चा पालिकेच्या वर्तुळात होती. निविदा प्रक्रियेत पुढे काय होते, याकडेही लक्ष लागले होते. आता निविदा प्रक्रियाच रद्द करण्यात आल्याने सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. मात्र नेत्यांमधील अंतर्गत वादामुळे नागरिकांना सुविधा मिळण्यास विलंब होऊ नये, असे मत व्यक्त केले जात आहे.

**“ सुरुवातीला काढलेल्या निविदेमध्ये कॅन्सरग्रस्तांवर केवळ किरकोळ उपचार करण्याच्या सुविधांचा समावेश होता. त्यामुळे ती निविदा प्रक्रिया रद्द करत सर्व सुविधा उभारण्याच्या कामांचा त्यात समावेश करून निविदा प्रक्रिया राबवण्याची मागणी केली होती. त्यानुसार आता कार्यवाही केली जात आहे. यामुळे रुग्णालयाच्या उभारणीला थोडा विलंब होणार असला, तरी शहरात कॅन्सरग्रस्त रुग्णांसाटी सर्व उपचारसुविधा उपलब्ध होणार आहेत.**

**- गीता जैन, आमदार, मिरा-भाईंदर**

प्रशासनाने सुरुवातीला काढलेली निविदा सर्वसामान्य रुग्णालय डोळ्यासमोर ठेवून काढण्यात आली होती. त्यामुळे आता कॅन्सर रुग्णालयासाठी आवश्यक सर्व उपचारसुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सल्लागाराची नियुक्ती करून पुन्हा नव्याने निविदा प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे याबाबत सांगण्यात आले.

पुढारी पा. न. ३

## श्रमिक पतपेढी सुरू करण्यास अटी-शर्ती

**भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेत भाजप प्रणित मिरा-भाईंदर महानगरपालिका श्रमिक कर्मचारी सहकारी पतपेढी या पतसंस्थेने १९८६ पासून कार्यरत असलेल्या मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेला शह देण्यासाठी ३१ जानेवारी २०१७ रोजी समांतर पतसंस्था स्थापन केली. त्यावर मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेने आक्षेप घेतल्यानंतर याप्रकरणी कोकण विभागीय सहनिबंधकांसह तत्कालीन सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे १९ डिसेंबर २०१९ व ६ जानेवारी २०२२ रोजी पार पडलेल्या सुनावणीत श्रमिकची नोंदणी रद्द ठरविली. याविरोधात श्रमिकने ऑक्टोबर २०२२ मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या आदेशात श्रमिकला पतपेढी सुरु करण्यास तीन महत्वाच्या अटीशर्ती घालून ३१ मे पर्यंत त्यांची पूर्तता करण्याचे निर्देश दिले. तर श्रमिकने आपल्या कार्यालयाबाहेर बॅनर लावून १ जून पासून पतसंस्थेचे कार्यालय पुन्हा सुरु होणार असल्याचे स्पष्ट केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेने श्रमिक पतसंस्थेच्या गैर कारभाराविरोधात कोकण विभागीय सहनिबंधकांकडे तक्रार केली. त्यावर पार पडलेल्या सुनावणीत श्रमिक पतसंस्थेने पालिकेच्या नावाचा वापर करण्याकरीता तसेच त्या नावाने नोंदणी करण्याकरीता पालिका आयुक्तांची परवानगी घेतली नसल्याचा दावा केला. तो मान्य करीत सहनिबंधकांनी श्रमिकची नोंदणी रद्द ठरविली. श्रमिकने कर्मचारी पतसंस्थेच्या सदस्यांना जबरदस्तीने सदस्य करून घेतल्याने या दोन्ही पतसंस्थेत सदस्य संख्येवरून वाद निर्माण झाला होता. त्यात पालिका आस्थापनेवर त्यावेळी एकूण १ हजार ४७१ अधिकारी, कर्मचारी कार्यरत होते. त्यापैकी मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे ८४३ सभासद तर श्रमिकचे ४५२ सभासद होते. त्यापैकी १४८ सभासद मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे तर २३ सभासद सेवानिवृत्त, राजीनामा दिलेले, निवृत्त तसेच मयत झालेले आहेत.

CamScanner

दि. 20/05/2023

पुण्य नगरी पु. पा. न. १

# ग्रामस्थांना विश्वासात घेऊनच रस्त्याचे काम करा : प्रताप सरनाईक

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमधील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने किल्ल्याच्या सुशोभीकरण व नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. लवकरच सुशोभीकरणाच्या कामाचे उद्घाटन केले जाणार आहे. घोडबंदर किल्ल्याच्या परिसरातील जागा महसूल खात्याची असून येथील रस्ता विकसित करण्यासाठी आजूबाजूच्या १० ते १२ मीटर परिसरात २५ घरे बाधित होत आहेत. या सर्व बाधितांना पक्की मालकी घरे महापालिकेकडून देण्यात यावीत, प्रत्येकाचे पुनर्वसन पक्की घरे देऊन केले जाईल, कोणालाही विस्थापित होऊ देणार नाही आणि सर्वप्रथम हा रस्ता विकास करायचा असेल तर आधी ग्रामस्थांना विश्वासात घ्या, सर्वसामान्य लोकांच्या घरांवर बुलडोझर फिरवून आम्हाला विकास नको आहे, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी रहिवाशांना सांगितले आहे.

घोडबंदर किल्ल्या लगत ते शिवसृष्टीकडे जाणारा ९ मीटर प्रस्तावित रस्ता विकसित केला जाणार आहे. घोडबंदर किल्ल्याचे सुशोभीकरण व बाजूच्या जागेत ५४ कोटी खर्च करून शिवसृष्टी विकसित केली जाणार आहे. या किल्ल्याकडे तसेच शिवसृष्टीकडे जाण्यासाठी रस्ता



उपलब्ध नसल्यामुळे या ठिकाणी किल्ल्यालगत ९ मीटर प्रस्तावित रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या प्रस्तावित रस्त्यामध्ये २५ घरे बाधित होत आहेत. हा ९ मीटर रस्ता विकसित करत असताना ग्रामस्थांना विश्वासात घेऊनच रस्त्याचे काम सुरू करावे; पण ९ मीटर रस्त्याला ग्रामस्थांचा विरोध असेल तर पर्यायी रस्त्याचा महापालिकेने विचार करावा. जो काही रस्ता करायचा असेल तो स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेऊनच करावा. जर सध्याच्या प्रस्तावित रस्त्यात जास्त घरे बाधित होत असतील तर रस्ता दुसरीकडून वळवा. सर्वसामान्य नागरिकांच्या घरादारावर बुलडोझर फिरवून विकास आम्हाला नको आहे, असे सांगून कोणत्याही परिस्थितीत घोडबंदरच्या स्थानिक नागरिकांच्या मी सोबत राहणार, असा शब्द आमदार सरनाईक यांनी दिला. किल्ल्याच्या सभोवतालची जागा ही महसूल खात्याची जमीन असून या जमिनीवर गेल्या अनेक वर्षांपासून घोडबंदर गावातील हे २५ नागरिक राहत आहेत. पुरातत्त्व खात्याच्या सूचनेनुसार, किल्ल्याच्या परिसरात साधारण १० ते १२ मीटर क्षेत्रात घरे किंवा व्यावसायिक दुकाने नसावी, असे सांगण्यात आले आहे. या किल्ल्याला कोणतीही बाधा पोहोचू नये, किल्ल्याचे योग्य प्रकारे संगोपन झाले पाहिजे, असे पुरातत्त्व विभागाने महापालिकेला कळवले आहे. त्यामुळे या २५ घरांना नोटीस देण्यात आली आहे. बाधित ग्रामस्थांनी माजी उपमहापौर चंद्रकांत वैती यांच्या माध्यमातून आयुक्तांसह सरनाईक यांची भेट घेतली. त्यावेळी ग्रामस्थांनी त्यांना निवेदन देत त्या रस्त्याला विरोध असल्याचे स्पष्ट करून जबरदस्तीने घरे रिकामी केल्यास सर्व ग्रामस्थ रस्त्यावर उतरून आंदोलन छेडतील, असा इशारा दिला आहे.

पुढारी पा. न. ८

# पालघरला ग्राहक तक्रार निवारण कार्यालय हवे

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

ठाणे जिल्ह्यातून पालघर जिल्हा विभाजित होऊन ८ वर्षे झाली. तरीही अनेक शासकीय कार्यालये या जिल्ह्यात अजूनही सुरु झालेली नाहीत. त्यापैकीच ग्राहक तक्रार निवारण मंच हे कार्यालय पालघर जिल्ह्यात स्वतंत्रपणे सुरु झालेले नाही. ठाणे जिल्ह्यातील तक्रार निवारण मंचाच्या कार्यालयाला गेली ७ वर्षे पालघर जिल्ह्यातील ग्राहकांच्या तक्रारी प्रलंबित असून पालक मंत्र्यांनी पालघर जिल्ह्यात शासकीय जागा असूनही हे कार्यालय स्वतंत्रपणे का सुरु होत नाही. काय अडचणी आहेत हे पाहून हे कार्यालय लवकर सुरु होईल याकडे लक्ष द्यावे. अशी मागणी पालघरवासियांची आहे.

पूर्वी ग्राहक तक्रारीसाठी ठाण्याला नागरिकांना हेलपाटे मारावे लागत. अनेकदा या न्यायालयात उशिराने तक्रारीची दखल घेतली जाते. मात्र आता शेकडो उत्पादने विक्री नियम पाळून मार्केटमध्ये आणली जात नाही. व्यापाऱ्यांची बनिया वृत्ती व नफेखोरीमुळे सामान्य ग्राहक लुटला जातो. मात्र याबाबतीत दाद कोणाकडे मागायची असा सवाल नेहमीच सामान्य ग्राहकाला पडतो. ठाणे कार्यालयात पालघर जिल्ह्यातील ग्राहकांच्या तक्रारी गेल्या सात वर्षांपासून प्रलंबित आहेत. पालघर जिल्हा कार्यालयात प्रशासकीय भवन बी येथे कार्यालयाकरिता खोली नंबर १०१ मध्ये ग्राहक तक्रार निवारण कार्यालयासाठी जागा राखीव ठेवण्यात आली आहे. मात्र हे कार्यालय अद्याप सुरू झालेले नाही. येथेही नव्या जिल्ह्यातील ग्राहक तक्रारदारांना न्यायासाठी कार्यालयाची वाट पहावी लागत आहे.

CamScanner

दि. २०/०५/२०२३

पुढारी पा. न. ३

# वेश्याव्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या महिलेला अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा भाईंदर शहरात वेश्या दलाल ही कॉलेज मध्ये शिकणाऱ्या ज्या मुलींना पैशाची अत्यंत गरज आहे अशा मुलींना हेरून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करत होती. तसेच त्या मुलींकडून तिच्या घरामध्ये वेश्याव्यवसाय करून घेत होती. वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या महिलेला अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने कारवाई करून अटक केली आहे. महिलेला अटक करून एका पिडित कॉलेजच्या मुलीची सुटका केली आहे.

भाईंदर पूर्वेला राहणारी एक महिला वेश्यादलाल भाईंदर पूर्व हि वेश्याव्यवसाय करीत असून तिचा मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला असता ती व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलीचे फोटो पाठवूनं पाठवलेल्या फोटोतील पुरुष गिऱ्हाईकांनी मुलीचा फोटो पसंत केल्यानंतर वेश्यागमनाचा मोबदला ठरवून तिचे राहते घरी वेश्यागनासाठी मुली पुरवित असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे पो. नि. समीर अहिरराव यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना महिला वेश्यादलाल हिने तिचे राहते घरी पाठवून सत्यता पडताळून पोलीस पथकासह छापा टाकून कारवाई केली. त्यावेळी महिला वेश्यादलाल व तिची साथीदर यांनी आपआपसात संगणमत करून बोगस गिऱ्हाईकास मुलींचे फोटो पाठवून त्या मुलीला वेश्यागमनासाठी प्रवृत्त करून वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवून तिच्या घरी बोलावुन रक्कम स्वीकारल्याने तिस मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी एका पिडित मुलीची सुटका करण्यात आली.

याबाबत महिला वेश्यादलाल विरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात भा.द.वि.सं. कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. समीर अहिरराव, सफौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, केशव शिंदे, सम्राट गावडे, महिला पो. अंम. अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब. शुभांगी मोकल यांनी केली आहे.

पुढारी पु. पा. न. ३

# बोगस डॉक्टरांवर कारवाई सुरूच

**वसई :** गेल्या काही वर्षापासून वसई-विरार पालिका क्षेत्रात बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते.याचाच एक भाग म्हणून नुकतीच तीन बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली. या तीन बोगस डॉक्टरांकडे खोटी वैद्यकीय प्रमाणपत्रे आढळून आली. यापैकी दोघांकडे बोगस प्रमाणपत्र असल्याचे आढळले, तर एकाने मृत बहिणीच्या नावाने दवाखाना सुरू ठेवला. पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या कारवाईत हे प्रकरण उघडकीस आले आहे. वसई-विरारमध्ये मागील वर्षी चार बोगस डॉक्टरांवर कारवाई झाली होती. त्यानंतर, पुन्हा बोगस डॉक्टर सक्रिय झाल्याची माहिती मिळाल्याने पालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली. यावेळी बोगस डॉक्टरांची तीन प्रकरणे समोर आली. विरार पश्चिम, वाय.के. नगर येथील भानू चंपकलाल शहा या महिलेचे क्लिनिक संशयास्पद वाटल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती कोकाटे यांनी तपासणी केली. यावेळी या महिलेने गुजरात कौन्सिलचे, नेचरोपॅथी प्रमाणपत्र दाखवले होते. मात्र कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र नसल्याने अर्नाळा पोलिस ठाण्यात २० एप्रिल रोजी गुन्हा-दाखल करण्यात आला होता. ही महिला दोन वर्षांपासून रुग्णांना तपासत होती.

पुढारी पा. न. ५

# महिला पोलीस हवालदारास लाच घेताना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विरार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलीस हवालदार समिक्षा संतोष मोहिते यांना एक हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाला लाचखोरीचे ग्रहण लागले आहे. गेल्या एक दीड महिन्यात चार पोलीस कर्मचाऱ्यांना लाच घेताना अटक करण्यात आली आहे. यामुळे पोलीस विभागाची नाचक्की होताना दिसत आहे. विरार पोलीस ठाणे हद्दीत कार्यरत असलेल्या मपोहवा समिक्षा संतोष मोहिते (५१) यांनी तक्रारदार यांनी स्वतःच्या भावाविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यामध्ये दोन्ही भावामध्ये आपापसात समझोता झाल्याने तक्रारदाराने आता कोणत्याही प्रकारची कारवाई करू नका, अशी विनंती केली होती. प्रतिबंधात्मक कारवाई न करण्यासाठी व प्रकरण पोलीस ठाण्यातच मिटविण्यासाठी मोहिते यांनी तक्रारदाराकडे १५०० रुपये लाचेची मागणी केली होती. या दोघांमध्ये तडजोडीअंती १००० रुपये लाचेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्यामुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी सापळा रचला व मोहिते यांना १००० रुपये लाच घेताना शुक्रवारी दुपारी पकडण्यात आले. त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

CamScanner

दि. २०/०५/२०२३

सकाळ पा. न. ३

# पोलिसांच्या ड्युटीचा निर्णय सर्वत्र राबवा!

## मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर मागणी

राजू परुळेकर : सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १९ : अखंडित पोलिस सेवा देणाऱ्या आणि वयाची ५५ वर्षे गाठलेल्या किंवा पूर्ण झालेले पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आता यापुढे रस्त्यावरील बंदोबस्ताच्या ड्युटीवर पाठवायचे नाही, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिस आयुक्तांना दिले आहेत. त्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. मात्र हा निर्णय हंगामी असून केवळ मुंबईपुरता लागू होणार आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश भागात पारा ४४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे हा निर्णय राज्यभरात सरसकट लागू करण्याची मागणी आता होत आहे.

एकनाथ शिंदे यांनी पोलिस दलातील वाढत्या कामाच्या ताणाचा विचार करून ५५ वर्षांच्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिलासा दिला आहे. भरउन्हात, पावसात किंवा कडाक्याच्या थंडीत या वयोगटातील कर्मचाऱ्यांना तैनात न करण्याचा आदेश त्यांनी दिला आहे. सर्व पोलिस, अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले आहे.

या संदर्भातील सूचना केवळ मुंबई पोलिस सहआयुक्तांना (वाहतूक विभाग) दिल्या आहेत. हे आदेश केवळ हंगामी असणार आहेत. त्याप्रमाणे परिपत्रक काढले आहे.

**- प्रवीण पडवळ,**
पोलिस सहआयुक्त, वाहतूक विभाग

उन्हाळ्यात विदर्भ, मराठवाड्यासह सर्वच भागात पोलिस कर्मचारी आपली काळजी घेऊन ड्युटी करतात. गृह विभागाने पुढाकार घेऊन हा निर्णय सर्व राज्यभर लागू करायला पाहिजे.

**- प्रवीण दीक्षित,**
निवृत्त पोलिस महासंचालक

मात्र, या आदेशाची अंमलबजावणी तात्पुरती न होता कायस्वरूपी होण्याची गरज पोलिस अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर पोलिस विभागाने परिपत्रक काढले आहे; मात्र ते केवळ हंगामी स्वरूपाचे असल्याची माहिती आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार पोलिस आयुक्तांनी ५५ वर्षांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ड्युटीचे नियोजन करण्यास सुरुवात केली आहे.

### पोलिसांवरील वाढता ताण



मुंबईत कामाचा बोझा, तणाव वाढल्याने पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा कर्तव्यावर मृत्यू होण्याच्या घटना वाढल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने आयुक्त विवेक फणसळकर यांना विनंती करण्यात आली आहे. ५५ वर्षे वयोमर्यादा असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांचे कर्तव्य निर्धारित करीत उपायुक्तांना लेखी स्वरूपात आदेश देण्यात यावेत. गुन्हे प्रकटीकरण किंवा तणाव वाढणारी कामे अशा कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना देऊ नयेत. या कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्रशासकीय कामासाठी करावी, असा लेखी आदेश पोलिस आयुक्त आणि उपायुक्तांना द्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

सकाळ पा. न. ५

# दुचाकी चोरणारे दोघे नालासोपाऱ्यात अटकेत

नालासोपारा (बातमीदार) : वाहनचालकांकडून जबरदस्तीने मोबाईल, पैसे, वाहन घेऊन फरार होणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात नायगाव पोलिसांना यश आले आहे. या टोळीतील दोन जणांना अटक करण्यात आली असून ६६ हजार रुपये किमतीचे दोन,मोबाईल आणि एक दुचाकी पोलिसांनी जप्त केली आहे. या चोरट्यांकडून आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यताही पोलिसांनी वर्तवली आहे. अभिषेक दिलीप त्रिपाठी व जाफर उर्फ सलमान अली खान असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव असून यातील अभिषेक हा ज़ोगेश्वरी पूर्व प्रताप नगर येथील तर जाफर हा नालासोपारा पूर्व संतोषभूवन परिसरातील राहणारा आहे. या दोघांनी १२ मे रोजी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील चिंचोटी परिसरात मोकळ्या जागेत राजमंगल सिंग हा व्यक्ती उभा असताना जबरदस्तीने त्याच्याकडील मोबाईल आणि मोटारसायकल घेऊन फरार झाले होते. याबाबत नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. वसई गुन्हे कक्ष युनिट २ चे पोलिस निरीक्षक शाहूराज रणवीरे, सहायक पोलिस निरीक्षक सुहास कांबळे, सागर शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

सामना पा. न. ५

# बेपत्ता मुली व महिलांचा तपशील सादर करा

## बाल हक्क आयोगाचे आदेश

मुंबई. दि. १९ (प्रतिनिधी) - राज्यात गेल्या तीन वर्षात जवळपास साडेतीन हजार मुली आणि महिला बेपत्ता झाल्या आहेत. या घटनेची राज्य बाल हक्क आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. बेपत्ता झालेल्या मुली व महिलांची तपशीलवार माहिती सादर करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा यांनी विशेष पोलिस महानिरिक्षकांना दिले आहे.

महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षात जवळपास साडेतीन हजार मुली आणि महिला बेपत्ता झाल्याची माहिती पोलिस आकडेवारीतून समोर आले आहे.

यासंदर्भात बाल हक्क आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा यांनी आज विशेष पोलिस महानिरीक्षक पत्र लिहून लक्ष वेधले आहे. राज्यात मुली व महिला बेपत्ता होण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली असून हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. त्यामुळे याप्रकरणी तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणी चर्चा करण्यासाठी येत्या २४ मे रोजी अध्यक्षा सुशिबेन शहा या विशेष पोलिस महानिरीक्षकांची भेट घेणार असल्याची माहिती बाल हक्क आयोगातर्फे देण्यात आली. या भेटीत जिल्हानिहाय बेपत्ता मुली आणि महिलांची तपशीलवर माहिती सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

यापूर्वी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनीही या प्रकरणी कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. गेल्या काही दिवसांपासून महिला आणि मुली बेपत्ता होण्यात वाढ झालीय. मुली बेपत्ता होण्याची संख्या वाढतेय. याबाबत महिला आयोगासमोर अहवाल, उपाययोजना सादर करा असे आदेश दिले आहेत.

CamScanner

दि. 20/05/2023

सकाळ पा. नं. २

# सोशल मीडियावरील तक्रारींची नोंद घेणार : एकनाथ शिंदे

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. १९ : नागरिक पत्राने तक्रारी करण्याबरोबरच आता ट्विटरवरून आणि फेसबुकवरूनदेखील समस्या मांडत असतात. बदलत्या काळानुसार त्याची नोंदही घेण्याची आवश्यकता असून त्यासाठीची व्यवस्था उभी करण्याची सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माहिती तंत्रज्ञान विभागाला केली.

'आपले सरकार आणि मुख्यमंत्री सचिवालय' अशी संयुक्त यंत्रणा उभारण्यात येत असून ती त्वरित कार्यान्वित करण्याची सूचना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. आज 'सह्याद्री' अतिथिगृह येथे माहिती तंत्रज्ञान विभागाच्या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात बैठक पार पडली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. माहिती तंत्रज्ञान प्रधान सचिव पराग जैन आणि माहिती तंत्रज्ञान संचालक जयश्री भोज यांनी यासंदर्भात सादरीकरण केले.



सध्याच्या डिजिटल युगात नागरिक पारंपरिक पद्धती व्यतिरिक्त ई-मेल, ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम तसेच इतर समाज माध्यमातून सरकारकडे विविध सूचना, तक्रारी, निवेदने पाठवीत असतात. त्याचा पाठपुरावाही आवर्जून केला जातो. त्यावर कार्यवाहीसाठी माहिती-तंत्रज्ञान विभाग हा 'आपले सरकार' टीमच्या मदतीने ही यंत्रणा उभारत असून ती लवकर कार्यान्वित करावी, असे असे मुख्यमंत्री म्हणाले.

## मुख्यमंत्री डॅश बोर्ड

मुख्यमंत्री डॅश बोर्ड, मुख्यमंत्री हेल्पलाईनविषयी माहिती देण्यात आली. हेल्पलाईनमध्ये चॅटबॉट तसेच व्हॉट्स ॲपचा अंतर्भाव करण्यात आल्याचेही सांगण्यात आले. यामध्ये मुख्यमंत्र्यांना काही महत्त्वाचा संदेश नागरिकांना द्यायचा असल्यास त्याचीही सोय असेल.

सामना पा. नं. ८

# जागावाटपाची अजून चर्चा नाही

## संजय राऊत यांची स्पष्टोक्ती



नांदेड, दि. १९ (प्रतिनिधी) - राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबत जागावाटपाच्या बैठका कोणी घ्यायच्या, कशा घ्यायच्या, जागावाटपाचे सूत्र काय असावे यासंदर्भात चर्चा झाली. मात्र जागावाटपासंदर्भात अजून कोणतीही चर्चा झाली नसल्याची स्पष्टोक्ती शिवसेना नेते-खासदार संजय राऊत यांनी केली.

शिवसेना नेते-खासदार संजय राऊत हे दोन दिवसांच्या नांदेड दौऱ्यावर आले आहेत. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी महाविकास आघाडीची वज्रमूठ भक्कम असून आम्ही एकत्रच लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका लढवणार असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेने १९ जागा जिंकल्या होत्या. यावेळीही या जागा आमच्याकडेच असतील, असे ते म्हणाले.

### झोपलेल्या लोकांसमोर फडणवीसांचे वाचन

पुण्यात भाजप कार्यकारिणीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्या 'लोक माझे सांगाती' या पुस्तकातील शिवसेनेसंदर्भातील काही भाग वाचून दाखवला. फडणवीस वाचत होते त्यावेळी बैठकीतील अर्धे लोक झोपलेले होते, कोणी जांभया देत होते, कोणी पेंगत होते, कोणी आळस देत होते. झोपलेल्या लोकांसमोर फडणवीसांचे वाचन चालू होते, असा टोला संजय राऊत यांनी लगावला.

### मेलेल्या पोपटाला ऑक्सिजन देण्याचा प्रयत्न

राज्यातील घटनाबाह्य सरकारचा पोपट केव्हाच मेला आहे. मेलेल्या पोपटाला ऑक्सिजन देण्याचा बेकायदेशीर प्रयत्न सध्या सुरू असल्याची टीका संजय राऊत यांनी केली. विधानसभेचे अध्यक्ष हे घटनात्मक पद आहे. त्यामुळे त्याविषयी निश्चितच आदर आहे. सध्याचे विधानसभेचे अध्यक्ष फार मोठे घटनातज्ज्ञ असल्यामुळे त्यांच्याकडून चांगल्या निर्णयाची अपेक्षा असल्याचेही संजय राऊत म्हणाले. फडणवीसांमध्ये हिंमत असेल तर निवडणुका घ्या म्हणजे कोणाचा पोपट उडतो हे कळेल, असा टोलाही राऊत यांनी लगावला.

CamScanner

CamScanner

दि. २०/०५/२०२३

सामना पा. न. ८

# महाविकास आघाडीच्या जागांबाबत एकत्र निर्णय घेऊ



पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) – सध्या महाविकास आघाडीत जागांबाबत आणखी कोणतीही चर्चा झाली नाही. आम्ही तिन्ही पक्ष एकत्र बसून त्यावर निर्णय घेऊ, असे शरद पवार यांनी सांगितले.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. शरद पवार म्हणाले, कर्नाटक निवडणुकीनंतर विरोधकांना एकत्र आणण्यासाठी मोठे प्रयत्न सुरू आहेत. तसेच आज देशामध्ये असा कुठलाही एक पक्ष नाही, जो संपूर्ण देशात निवडणूक लढेल. त्याकरिता वेगवेगळ्या राज्यांतील प्रबळ पक्ष जे पुरोगामी विचाराचे आहेत, त्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात अनेक पक्ष सहभागी होण्यासाठी सहकार्य करीत आहेत. काही दिवसांनंतर बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनीसुद्धा एक बैठक बोलाविणार असल्याचे सांगितले.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून असे लक्षात आले की, सध्या भाजपची प्रतिमा जनमानसामध्ये खराब झाली आहे. त्यामुळे लोक भाजपला मतदान करणार नाहीत. याची सुरुवात कर्नाटकमधून झाली आहे. देशात असा एकही पक्ष नाही, जो संपूर्ण देशात लढेल. म्हणून त्या-त्या घटक पक्षांना एकत्र घेऊन आघाडी करून निवडणूक लढविण्याचे प्रयत्न राष्ट्रीय स्तरावर सुरू आहेत, असे शरद पवार म्हणाले.

**कर्नाटक मंत्रिमंडळाच्या शपथविधीला जाणार**

मला सकाळीच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचा फोन आला होता. त्यांनी आग्रह केला आहे की, मी त्या शपथविधीला यावे. त्यामुळे मी उद्या कर्नाटक सरकारच्या शपथविधीला जाणार असल्याचे शरद पवार यांनी यावेळी सांगितले.

लोकसत्ता पा. न. १४

# स्थानिक मच्छीमारांना भाईंदरच्या मासळी बाजारात जागा

लोकसत्ता वार्ताहर



**भाईंदर :** भाईंदर रेल्वे स्थानकाजवळ भरल्या जाणाऱ्या मासळी बाजारात स्थानिक मच्छीमारांना जागा मिळत नसल्याची तक्रार सातत्याने समोर येत होती. त्यामुळे याबाबत मच्छीमार संघटनानी विरोध केल्यानंतर स्थानिक संस्थेच्या नावे जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे.

मीरा भाईंदर हे शहर समुद्रकिनारी वसलेले शहर आहे. त्यामुळे भाईंदर पश्चिमेला रेल्वे स्थानकालगत असणाऱ्या रस्त्यावर दररोज पहाटे मासळी बाजार भरतो. ह्या मासळी बाजारात स्वस्त दरात आणि चांगली मासळी मिळत असल्याने मीरा-भाईंदरसह लगतच्या शहरातील नागरिक व किरकोळ मासळी विक्रेते मासळी घेण्यासाठी हजेरी लावतात. येथे मासळी विक्री करण्यासाठी मीरा-भाईंदरसह वसई विरारमधील अनेक मच्छीमार येतात. दररोज मासळी विक्रीतून ह्या बाजारात लाखो रुपयांची उलाढाल होते.

या बाजारात मासळी विक्री करण्यासाठी मीरा-भाईंदर पालिकेकडून काहींना जागा उपलब्ध देण्यात आल्या आहेत. ह्यात स्थानिक मच्छीमार किंवा मच्छीमार संस्थांचा समावेश नाही. ह्याचा गैरफायदा घेत, जागा असणारे मासळी विक्रीसाठी आलेला मच्छीमार व खरेदी करण्यासाठी आलेले ग्राहक ह्यांच्यात अडत्याचे (मध्यस्थी) काम करतात. परिणामी मच्छीमारांना कमी भाव मिळत असल्याने अनेकदा मोठे नुकसान सहन करावे लागते. उत्तनमधील मच्छीमारांच्या शिष्टमंडळाने सोमवारी मनपा आयुक्त दिलीप ढोले यांची भेट घेतली होती. यावर पालिकेकडून जागेची प्रत्यक्ष पाहणी करून स्थानिक मच्छीमारांना जागा उपलब्ध करण्याचा निर्णय पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी घेतला आहे. त्यानुसार शहरातील सहा मच्छीमार संस्थांना मुख्य बाजारात पत्राशेड खाली जागा देण्यात आली असल्याचे पालिकेकडून जाहीर करण्यात आले आहे.

CamScanner

दि. २०/०५/२०२३

लोकसत्ता पा. न. १४

# वसई–भाईंदरमधून चार महिन्यांत २०८ मुले बेपत्ता

## अद्याप २२ मुलींचा शोध नाही

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई आणि भाईंदरमधून अल्पवयीन मुले-मुली बेपत्ता होण्याच्या घटना वाढत आहेत. मागील ४ महिन्यांत शहरातून तब्बल २०८ अल्पवयीन मुलेमुली बेपत्ता झाले होते. त्यापैकी १८० मुलामुलींचा शोध लागला आहे. अद्याप २८ मुलेमुली बेपत्ता आहेत. त्यामध्ये २२ मुली आणि ४ मुलांचा समावेश आहे.



**तपशील**

| | बेपत्ता | सापडले | बेपत्ता |
|---|---|---|---|
| परिमंडळ १ | ४६ | ४१ | ४ |
| परिमंडळ २ | ८८ | ८१ | ७ |
| परिमंडळ ३ | ७५ | ६० | १५ |

अल्पवयीन मुलेमुली बेपत्ता झाल्यास अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात येतो. शहरातून अल्पवयीन मुलेमुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत आहेत. प्रेमसंबंधातून तसेच घरगुती वादातून मुलेमुली घर सोडून जात असतात. अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेले जात असते. ही एक मोठी सामाजिक समस्या आहे.

चालू वर्षात १ जानेवारी ते ३० एप्रिल या ४ महिन्यांत वसई विरार आणि मीरा भाईंदर शहरातून तब्बल २०८ मुलेमुली बेपत्ता झाले होते. त्यामध्ये ४६ मुले आणि १५८ मुलींचा समावेश होता. पोलिसांनी यापैकी १३६ मुली आणि ४६ मुलांचा शोध लावला आहे. अद्याप ४ मुले आणि २२ मुली बेपत्ता आहेत. २०२२ या वर्षात वसई विरार शहरातून ५०० अल्पवयीन मुलेमुली बेपत्ता झाली होती. यापैकी ४४२ मुलामुलींचा शोध लागला असून त्यातील अद्याप ५८ मुलेमुली बेपत्ता आहेत. एकूण ५०० बेपत्ता मुलामुलींमध्ये १४४ मुले आणि ३५६ मुलींचा समावेश आहे. ३१ डिसेंबरपर्यंत १३४ मुले आणि ३०८ मुली मिळून एकूण ४४२ जणांचा शोध लागला; परंतु १० मुले आणि ४८ मुले असे एकूण ५८ जण बेपत्ता होते.

लोकसत्ता पा. नं. १४

# भेसळखोर मोकाट

## वसई, विरारमध्ये वर्षभरात केवळ २९५ ठिकाणी कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई, विरार शहरात भेसळ्युक्त पदार्थ तयार करुन ते विक्री करण्याचे प्रकार सुरूच आहेत. याची तपासणी करण्याकडे अन्न औषध प्रशासन विभागाचे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला. वर्षभरात केवळ २९५ ठिकाणी तपासणी झाली आहे.

वसई विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. यासोबतच दुकाने, उपाहारगृहे, मिठाई विक्रेते, खाद्यपदार्थ विक्रेते यांची संख्या वाढली आहे. विशेषतः रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थ विक्री होऊ लागली आहे. तर दुसरीकडे महामार्गालगतसुद्धा अनेक ढाबे, खानावळी तयार झाल्या आहेत.

परंतु त्या ठिकाणी असलेले खाद्यपदार्थ खाण्यासाठी योग्य आहेत किंवा नाही किंवा ते पदार्थ चांगल्या दर्जाच्या तेलाचा व साहित्याचा वापर करून बनविले आहेत किंवा नाही याची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी प्रशासनाची यंत्रणा नाही. त्यामुळे अनेक खाद्यपदार्थ विक्रेते सर्रासपणे भेसळ्युक्त पदार्थ विक्री करू लागले आहे. तसेच मिठाईवरसुद्धा मिठाई तयार केल्याची दिनांक व त्यांची अंतिम मुदत त्यावर टाकणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र काही दुकानदार त्या नियमांकडे दुर्लक्ष करतात.

मागील काही वर्षांत भेसळ्युक्त मावा, तेलाचा पुनर्वापर, नकली पनीर, बुरशीजन्य पदार्थ, दूषित पाण्याचा वापर करून केलेले पदार्थ असे प्रकार समोर आले होते. मात्र अजूनही हव्या त्या प्रमाणात कारवाई होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ कायम असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. भेसळ्युक्त पदार्थांची विक्री व ते तयार करणाऱ्यावर तपासणी मोहीम ही अन्न औषध प्रशासन सातत्याने राबवून कारवाई सुरू असते.

असे जर प्रकार सुरू असतील तर त्यांची पाहणी करून निश्चितच कारवाई होईल असे पालघर अन्न औषध प्रशासन सहायक आयुक्त पी. आर. सिंगरवाड यांनी सांगितले आहे.

### अन्न व औषध प्रशासनाचे वसईत कार्यालय नाही

वसई, विरार भागात भेसळखोरीचे प्रमाण वाढले आहे. यावर अंकुश ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय वसईत नसल्याने सर्रासपणे भेसळ्युक्त पदार्थांची विक्री होऊ लागली आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे. यासाठी वसईत प्रशासनाने कार्यालय सुरु करावे, अशी मागणी महाराष्ट्र कन्झ्युमर फोरमचे सरचिटणीस शंकर बने यांनी केली आहे.

### स्वच्छता गुणवत्ता तपासणी यंत्रणेचा अभाव

पालिकेने परवाने देताना विविध आस्थापनांची स्वच्छता आणि गुणवत्तेची तपासणी करणे गरजेचे आहे. मात्र तशी यंत्रणाच पालिकेने उभी केली नसल्याने शहरातील खाद्य पदार्थांच्या दुकानांना परवाने, नाहरकत दाखले देताना त्यांच्या स्वच्छतेची आणि गुणवत्तेची कोणतीही तपासणी केली जात नाही.





### केवळ ३७ गुन्हे

पालघर व वसई, विरार शहरात भेसळ्युक्त पदार्थ तयार करणे, त्यांची विक्री करणे असे प्रकार सुरू आहेत. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते मनीष सामंत यांनी माहिती मागितली होती. त्यात २०२२–२३ या वर्षभरात केवळ २९५ ठिकाणी तपासणी झाली आहे तर ३०२ अन्नाचे नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले होते. ३७ प्रकरणी गुन्हे दाखल करून ते न्यायालयासमोर ठेवण्यात आल्याची माहिती अन्न प्रशासन विभागाकडून देण्यात आली.

CS CamScanner

दि. २०/०५/२०२३

लोकसत्ता पा. न. १५

# निवृत्त व्यक्तीस पावणेचार लाखांचा गंडा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** औषध परत करण्यासाठी 'गूगल'चा आधार घेणे एका निवृत्त व्यक्तीस चांगलेच महागात पडले आहे. सायबर भामट्याने त्यांना तीन लाख ४६ हजार रुपयांचा गंडा घातला आहे.

मीरा रोड येथील शीतलनगरमध्ये राहणाऱ्या ५७ वर्षीय फिर्यादीस ३४० रुपयांचे एक औषध कंपनीला परत करायचे होते. त्यासाठी त्यांनी 'गूगल'वर 'टाटा एमजी'चा क्रमांक शोधला. त्या नंबरवर संपर्क साधला असता एका व्यक्तीने त्यांना पैसे परत करण्यासाठी बँकेचा खाते क्रमांक मागितला. त्यानुसार फिर्यादी यांनी त्याला आपला खातेक्रमांक दिला. या खात्यावर ३४० रुपये पाठवले आहेत, असा दावा त्या व्यक्तीने केला. मात्र पैसे आले नव्हते. त्या वेळी काही तांत्रिक अडचण असेल असे सांगून ठकसेनाने त्यांना 'एनी डेस्क ॲप' डाऊनलोड करायला सांगितले. त्यानंतर या 'ॲप'द्वारे फिर्यादीच्या खात्यातून तीन लाख ४६ हजार रुपये लंपास केले.

या प्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात फसवणुकीचे कलम ४२० आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमनाचे कलम ६६ (सी) आणि ६६ (डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

लोकसत्ता पा. न. १५

# सराईत चोराच्या हल्ल्यात पोलीस जखमी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** चोरीच्या प्रकरणात अटक करण्यासाठी गेलेल्या आरोपीने पोलिसावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेचा पोलीस हवालदार जखमी झाला आहे. पोलिसांनी हल्लेखोर आरोपीला अटक केली आहे.

शाहरूख सरदार (वय २२) हा आरोपी चोरलेले मोबाइल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखा ३ चे पोलीस पथक वसई पूर्वेच्या वालीव येथील गावराईपाडा परिसरात आले होते. त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी जीवनगरनाका येथील लीला शाळेजवळ सापळा लावला होता. पहाटेच्या सुमारास शाहरूख तेथे आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेण्यास सुरुवात केली. या वेळी त्याने पोलीस हवालदार अनिल नागरे यांच्यावर चाकूने हल्ला केला. यात नागरे यांच्या हाताला जखम झाली आहे. हल्ल्यानंतर पळून जाणाऱ्या आरोपी शाहरूखला पोलिसांनी पाठलाग करून पकडले. त्याच्याकडून चोरीचा ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शाहरूखविरोधात वालीव पोलिसांत सरकारी कामात अडथळा आणणे व शस्त्र अधिनियमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

लोकसत्ता पा. न. १५

# मारहाण प्रकरणातील आणखी एकाचा मृत्यू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** नालासोपारा येथे तीन मित्रांमध्ये भांडणानंतर झालेल्या मारहाणीत जखमी झालेल्या किसन झा या तरुणाचा शुक्रवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत रौनक तिवारी याचा यापूर्वीच मृत्यू झाला होता.

नालासोपारा येथील चहाच्या दुकानात बुधवारी दुपारी शिवम दुबे, किसन झा आणि रौनक तिवारी या तीन मित्रांमध्ये हाणामारी झाली होती. त्यात तिघेही जखमी झाले होते. त्यावेळी तिवारी याचा मृत्यू झाला होता, तर झा याच्यावर मुंबईच्या शताब्दी रुग्णालयात, तर दुबे याच्यावर केईएम रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, शुक्रवारी उपचारादरम्यान झा याचा मृत्यू झाला. ही हत्या दुबे यानेच केल्याचे शुक्रवारी पोलिसांनी सांगितले. तो रुग्णालयातून आल्यानंतर त्याला अटक केली जाणार आहे. हे हत्याकांड प्रेमप्रकरणातील वादातून घडले असण्याची शक्यता आहे.

CS CamScanner
CamScanner

लोकमत

# जबरीने चोरी करणाऱ्या दुकलीला केली अटक

## गुन्हे शाखेच्या युनिट-२ ची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : लघुशंकेसाठी थांबलेल्या दुचाकीस्वाराकडून मोबाइलसह दुचाकी जबरीने चोरणाऱ्या दुकलीला गुरुवारी मुंब्रा येथून गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी शुक्रवारी दिली आहे.

सोमेश्वरनगर, आई चंडिका चाळ येथे राहणारे राजमंगल सिंग (३२) हे १२ मे रोजी रात्री बाराच्या सुमारास दुचाकीवरून जात असताना लघुशंका आली म्हणून रस्त्याच्या कडेला दुचाकी उभी करून उभे होते. यावेळी दोन चोरांनी त्यांना पकडून खिशातील दोन मोबाइल, दुचाकीची चावी व रोख रक्कम असा ६८ हजारांचा मुद्देमाल चोरी करून ते दुचाकी घेऊन पळून गेले होते. नायगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. गुन्हे शाखेच्या युनिट-२ चे अधिकारी व अंमलदार यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन महामार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज प्राप्त करून चोरट्यांचा पळून जाण्याचा मार्गाचा शोध घेतला.

### यांनी बजावली कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा वसई युनिट-२ चे पोलिस निरीक्षक शाहुराज रणवरे, सहायक पोलिस निरीक्षक सुहास कांबळे, सागर शिंदे, सहायक फौजदार रमेश भोसले, संजय नवले, पोलिस हवालदार चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, प्रशांतकुमार ठाकुर, अमोल कोरे, संतोष चव्हाण यांनी केली आहे.

बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी अभिषेक दिलीप त्रिपाठी आणि जाफर ऊर्फ सलमान अमीर अली खान या दोघांना ताब्यात घेऊन तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. गुरुवारी झैनबिया, मुंब्रा येथून ताब्यात घेतले. आरोपीने चोरलेले व्ही.वो. कंपनीचे दोन मोबाइल व दुचाकी असा मुद्देमाल हस्तगत केला.



CamScanner

मूल्य ₹ 5.00

सुविचार
किसी का भला करके देखो, हमेशा लाभ में रहोगे। किसी पर दया करके देखो, हमेशा याद में रहोगे।

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, शनिवार 20 मई 2023

निष्पक्ष नजर, निष्पक्ष खबर

देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

अंदर पढ़ें

# क्राइम ब्रांच को मिली सफलता, लूट को अंजाम देने वाले 2 अपराधी पकड़े गए

**दबंग रिपोर्टर » वसई**



मोबाइल फोन के साथ मोटरसाइकिल की जबरन चोरी करने वाले दो शातिर अपराधियों को क्राइम ब्रांच युनिट 2 वसई की टीम ने गिरफ्तार कर माल जप्त किया है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 2 के पी.आई शाहुराज रणवरे,स.पो.नि.सुहास कांबले व सागर शिंदे की टीम ने की है।

यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। पुलिस के मुताबिक,12 मई को रात्रि 12 बजे व 12;30 बजे के दरम्यान मुंबई-अहमदाबाद महामार्ग चिंचोटी ब्रिज के पास, जैन मंदिर गेट के आगे खुली जगह में शिकायतकर्ता राजमंगल संतलाल सिंह ने सड़क के किनारे काले रंग की हीरो होंडा शाइन एमएम.48 सी.डी. 9374 को सड़क किनारे खड़ा कर दिया। इसी दौरान दो अज्ञात व्यक्ति शिकायतकर्ता के पीछे आ गये और शिकायतकर्ता को कस कर पकड़ लिया और मोबाइल फोन, 2,000 रुपये नकद और उपरोक्त विवरण की हीरो होंडा शाइन गाड़ी जबरन चोरी करके फरार हो गए। इस मामले में नायगांव थाने में अज्ञात आरोपी के ऊपर 392,34 के तहत केस दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि उक्त अपराध की सूचना मिलते ही अपराध शाखा कक्ष 2, वसई इकाई के अधिकारी एवं कर्मचारी वरिष्ठों के आदेश पर तत्काल उक्त अपराध स्थल पर पहुंचे व सीसीटीवी कैमरों की फुटेज देखने के बाद चोरों के भागने का रास्ता मिल गया व चोरी हुए मोबाइलों के तकनीकी विश्लेषण से प्राप्त जानकारी के आधार आरोपी अभिषेक दिलीप त्रिपाठी व जाफर उर्फ सलमान अमीर अली खान को हिरासत में लिया,जब उसे हिरासत में लेकर पूछताछ की गई तो पता चला कि उसने उक्त अपराध को अंजाम दिया है। 18 मई को झौनबिया,मुंब्रा,जिला ठाणे से हिरासत में लिया गया।उक्त अपराध में आरोपियों के शरीर की तलाशी के दौरान, शिकायतकर्ता की जबरन चोरी व्ही.वो कंपनी के दो मोबाइल फोन और शिकायतकर्ता के पास से 66,000 रुपये मूल्य की उपरोक्त विवरण की हीरो होंडा शाइन मोटर साइकिल जब्त की गई है।

CS CamScanner

दबंग दुनिया

मुंबई महानगर

## यातायात नियमों की अवहेलना करने के कारण हादसों की संख्या में इजाफा

# 90 दिनों में 51 हादसे, 39 मौतें

नाज लोपेज » पालघर

नालासोपारा। मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाली सभी सड़कों को चमकदार कर दिया गया है। इससे वाहनों की रफ्तार भी बढ़ गई है। लेकिन वाहन चालकों द्वारा यातायात नियमों की अवहेलना करने के कारण हादसों की संख्या में इजाफा हुआ है। पुलिस कमिश्नरेट के अंतर्गत पिछले तीन माह में 51 हादसे हो चुके हैं। इसमें 39 लोग मारे गए,कई लोग गंभीर रूप से घायल हुए हैं।

### हेलमेट पहनकर ही बाइक चलाए

मुंबई अहमदाबाद हाईवे हो या शहर की सड़कें, सभी सड़कें चमकदार हो गई हैं। इसलिए वाहन तेजी से चल रहे हैं। नतीजतन, दुर्घटना दर में वृद्धि हुई है। सामने आया है कि दुपहिया वाहन चालकों की मौत हेलमेट न पहनने की वजह से हुई है। इसलिए अपील की गई है कि हेलमेट पहनकर ही बाइक चलाएं।

### 39 की मौत और कई घायल

1 जनवरी से 31 मार्च तक 90 दिनों की अवधि के दौरान, पुलिस आयुक्तालय के तहत 17 पुलिस स्टेशनों की सीमा के भीतर 51 दुर्घटनाओं में 39 लोग मारे गए और कई घायल हुए।




### कहां होते हैं सबसे ज्यादा हादसे

पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले काशीमीरा,वालीव, पेल्हार और मांडवी के चार थाना क्षेत्रों में 32 दुर्घटनाएं और 23 मौतें हुई हैं। मुंबई-अहमदाबाद राजमार्ग चारों पुलिस थानों की सीमाओं से होकर गुजरता है और इस सड़क पर वाहन तेज गति से चलने के कारण घातक दुर्घटनाएं होती हैं।

ट्रैफिक नियम पालन करने के लिए हैं, सिर्फ जुर्माना वसूलने के लिए नहीं। यातायात नियमों का पालन किया जाए तो कई हादसों पर रोक लगाई जा सकती है। सड़क दुर्घटनाओं को रोकने के लिए सभी को यातायात नियमों का सख्ती से पालन करना चाहिए।

पुलिस प्रशासन

### किस थाने के तहत कितने हादसे !

| क्र. | पुलिस स्टेशन | हादसा |
|---|---|---|
| 1) | मिरा रोड | 0 |
| 2) | काशीमिरा | 6 |
| 3) | भाईंदर | 2 |
| 4) | उत्तन | 0 |
| 5) | नवघर | 1 |
| 6) | नयानगर | 0 |
| 7) | वसई | 1 |
| 8) | माणिकपूर | 2 |
| 9) | नायगाव | 1 |
| 10) | तुलिंज | 3 |
| 11) | वालीव | 13 |
| 12) | आचोले | 3 |
| 13) | विरार | 4 |
| 14) | पेल्हार | 6 |
| 15) | मांडवी | 7 |
| 16) | नालासोपारा | 1 |
| 17) | अर्नाला | 1 |

CS CamScanner